# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग

## २२ वा वार्षिक अहवाल

**१ एप्रिल, २०२२ ते**
**३१ मार्च, २०२३**

२०२२-२०२३

**अहवालाबद्दल**

या अहवालामध्ये राज्यामधील मानवी हक्कांचे सर्वसमावेशक विहंगावलोकन केले आहे. त्यामध्ये मानवी हक्काच्या आयोगाच्या उल्लंघनाच्य बाबींचा व त्याबाबतीतील सुधारणा करण्यासाठी केलेल्या, शिफारसी यांचा समावेश आहे. हा अहवाल आयोगाने केलेल अन्वेषण व काढलेले निष्कर्ष यावर तसेच नागरी सामाजिक संस्थांकडून व अन्य यांच्याकडून आलेल्या निविष्ठा (इनपुट्स) यांवर आधारलेले आहे.

# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग

## 22 वा वार्षिक अहवाल

## एप्रिल 2022 - मार्च 2023

## वार्षिक अहवाल - वर्ष 2022-23

प्रस्तावना

"मानवी हक्क म्हणजे काही थोड्या व्यक्तींनी दिलेले खास किंवा विशेष हक्क नव्हेत. मानवी हक्क असे स्वतंत्र हक्क आहेत की ज्याला सर्वजण पात्र आहेत. मानवी हक्कांच्या व्याख्येनुसार मानवी हक्कांमध्ये सर्व मानवांचे त्यांच्या आयुष्याच्या पहाटेचे व संध्याकाळचे (आयुष्यातील सर्व कालखंडाचे) हक्क यांचा समावेश होतो.

- काय ग्रँगर

दि.01.04.2022 ते दि.31.03.2023 या वर्षाचा 22 वा वार्षिक अहवाल सादर करताना आयोगाला आनंद होत आहे.

मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क. मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरुपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार व मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे व त्यांना प्रोत्साहन देणे हे त्या-त्या राज्यांचे कर्तव्य आहे. त्यानुसार भारतामधे मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 अस्तित्वात आला.

या अधिनियमाचे उद्‌दिष्ट सीमित असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करु शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करु शकतो असा असला तरीही महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वत:हून पुढाकार घेऊन चौकशी करणे यद्वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जागरुकता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रयत्नांचे फळ म्हणून मोठ्या संख्येने तक्रारी प्राप्त झाल्या व त्यांची चौकशी करण्यात आली.

जसजसे आपण मागील वर्षात डोकावतो, तसे आपल्याला जाणवते की, मानवी हक्कांचे चित्र असे दिसते की मानवी हक्कांच्या अंमलबाजवणीत खूप आव्हाने अडथळे आहेत. सध्याची राजकीय उलथापालथ व कोविड 19 महामारी यांचा दुर्बळ घटकांवर होणारा परिणाम ध्यानात घेऊन असे

आपण म्हणू शकतो की, मानवी हक्कांना संरक्षण देणे व त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आजच्या इतकी मोठी पूर्वी कधीच नव्हती.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा वार्षिक अहवाल महाराष्ट्र राज्यामधील मानवी हक्कांच्या स्थितीचे विहंगमावलोकन करु देतो. त्यामध्ये दुबळ्या व दडपलेल्या वर्गांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याबाबतची आयोगाची कटिबद्धता प्रतिबिंबित होते.

आयोगाला मिळणारे अनुदान व पायाभूत सुविधा मर्यादित असल्या, तरीही आयोग मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची गाऱ्हाणी व तक्रारी याकडे लक्ष देत आहे. महाराष्ट्र राज्यात मानवी हक्कांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे व सर्व समाजाच्या कल्याणासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे संवर्धन करणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रयत्न करीत आहे. या अहवालामध्ये आयोगाच्या या प्रयत्नांचे प्रतिबिंब दिसते

जसे आपण पुढे पुढे जातो तसे समजून घेतले पाहिजे की मानवी हक्क ही चैन नसून ती आवश्यक बाब आहे. आपण अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे चालू ठेवले पाहिजे आणि सर्वांसाठी अधिक न्यायपूर्ण व समान विश्व निर्माण करण्यासाठी कार्य केले पाहिजे. आम्हाला अशी आशा आहे की, हा अहवाल म्हणजे विश्वातील व्यक्ती, सरकार, व संस्था यांना या महत्वाच्या कामात आमच्या बरोबर सामील होण्यासाठी एक आमंत्रण आहे.

.

18-1-2024

न्यायमूर्ती के.के. तातेड (सेवानिवृत्त)
(अध्यक्ष)

M. A. Sayeed

(एम.ए. सईद)
प्रभारी अध्यक्ष / सदस्य

(तुकाराम मुंढे)
सचिव

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक | उपोद्घात | पृष्ठक्रमांक |
| --- | --- | --- |
| 1. | परिचय | १ |
| 2. | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी - संख्यात्मक | ६ |
| 3. | उदाहरणादाखल खटले | १४ |
| 4. | आयोगाच्या भेटी | २१ |
| 5. | जागरुकता अभियान | २७ |
| 6. | तक्रारी आणि शिफारसी नाकारणे | ३१ |
| 7 | स्त्रोत | ३४ |

## विभाग 1 - परिचय

राष्ट्रीय कायदे व आंतरराष्ट्रीय कायदे दोन्हीमध्ये मानवी हक्क हे वैशिष्ट्यपूर्ण कायदेशीर हक्क म्हणून ओळखले गेले आहेत. मानवी हक्क म्हणजे मानवी वर्तणूकीच्या दर्जाचे विवरण करणारी काही नैतीक तत्वे किंवा रिवाज होय. सर्वसाधारणपणे मानवी हक्क म्हणजे असे मूलभूत हक्क की जे मानवाला तो केवळ मानव आहे म्हणून त्याच्या जन्मापासून प्राप्त असलेले असे स्वाभाविक हक्क की जे अनन्य संक्राम्य आहेत व जे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात किंवा अन्य स्थिती यांच्या पलीकडे आहेत. ते हक्क सर्वत्र लागू पडतात व सार्वत्रिक आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला सारखेच आहेत या अर्थाने ते हक्क समतावादी आहेत. त्यांच्यासाठी समरसतेची आवश्यकता असते. तसेच कायद्‌याच्या नियमांची आवश्यकता असते व त्याद्‌वारे एखाद्‌या व्यक्तीने अन्य व्यक्तींच्या मानवी हक्कांचा सन्मान करावा असे त्या व्यक्तीवर बंधन येते.

मानवी इतिहासामध्ये हक्क व स्वातंत्र्याच्या कल्पना कोणत्या ना कोणत्या तरी स्वरुपामध्ये अस्तित्वात असल्या तरीही मानवी हक्कांच्या पूर्वीच्या कल्पना या मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांशी फारशा जुळत नव्हत्या. मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पना यांचा उगम आपल्याला युरोपमधील पुनरुज्जीवन व प्रोटेस्टंट यांच्या सुधारणा यातून शोधता येईल. तसेच मध्य युगामध्ये प्रभवाशाली असलेल्या सरंजामशाही पद्‌धती व धार्मिक रुढीप्रियता यांचा अस्त होणे यातूनही मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांचा उगम शोधता येईल.

रेडक्रॉसच्या आंतरराष्ट्रीय समितीचे संस्थापक श्री. हेन्री डुआंट यांच्या प्रयत्नांमुळे 1864 व 1949 यांच्यामध्ये जिनेव्हा संकेत अस्तित्वात आले. हे संकेत सशस्त्र संघर्षामध्ये गुंतलेल्या व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण करतात व ते 1899 व 1907 च्या हेग संकेतावर आधारित आहेत. धर्मनिरपेक्ष आंतरराष्ट्रीय कायद्‌याच्या उपजत स्वरुपामध्ये युद्‌ध व युद्‌ध विषयक गुन्हे याबाबतच्या कायद्‌यांना औपचारिक स्वरुप देण्याचा हा आंतरराष्ट्रीय समाजाचा पहिला प्रयत्न होता. दुसऱ्या महायुद्‌धामुळे या संकेतामध्ये सुधारणा झाली व ते संकेत आंतरराष्ट्रीय समाजाने 1949 मध्ये पुन्हा स्वीकारले.

दुसऱ्या युद्‌धातील अत्याचारानंतर मानवी हक्कांचे सामाजिक व कायदेशीर पद्‌धतीने संरक्षण होणे हे मूलभूत स्वातंत्र्य असावे याची काळजी वाढू लागली. संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना व संयुक्त राष्टसंघाच्या सनदीच्या तरतुदी या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा व पद्‌धतीसाठी एक सर्वसमावेशक व्यवस्थेचा / यंत्रणेचा पाया ठरला.

सर्व मानवांना मानवी हक्क प्राप्त करण्याचा हक्क आहे या सिद्धांतावर आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायदा आधारित आहे. मानवी हक्क सार्वत्रिक असणे, ते हक्क सर्व जगभरात समान असणे हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्याचा पायाभूत मानक ठरला. 1948 साली मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये या तत्वावर पहिल्यांदा भर देण्यात आला व अनेक आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संमेलने, ठराव व घोषणांमध्ये या तत्वांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. उदाहरणार्थ 1993 च्या व्हिएना आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये असे नोंदले गेले की देशांची राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक प्रणाली किंवा यंत्रणा कोणतीही असली तरी सर्व मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणे व त्यांचे संरक्षण करणे हे देशांचे कर्तव्य आहे.

मानवी हक्कांबाबतची सार्वत्रिक घोषणा यांच्या कलम 1 मध्ये असे म्हंटले आहे की "सर्व मानव स्वतंत्रीत्या जन्माला आले आहेत व ते सन्मान / प्रतिष्ठा व हक्क याबाबत समान आहेत. त्यांना समजूतदारपणा व सदसद्विवेकबुद्धी लाभली आहे व त्यांनी बंधुत्वाच्या भावनेने एकमेकांबरोबर वागावे." भारताच्या घटनेमध्ये सुद्धा मानवी हक्कांच्या सर्व सार्वत्रिक घोषेणेचा मूलभूत हक्क म्हणून समावेश केला आहे. भारताच्या संसदेने 1993 मध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 पारित केला. हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध सुरक्षितता प्रदान करतो. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्याचा तसेच जिल्हा स्तरावर मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे. आंतरराष्ट्रीय संकेत व मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 यांच्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापन दि.6 मार्च, 2001 रोजी झाली.

**<u>आयोगाची रचना</u>**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे -

जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल.

अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षांचा अनुभव आहे, अशी

अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.

**आयोगाचे कार्य**

शासकीय सेवकाकडून मानवी हक्कांचा भंग होत आहे का यावर लक्ष ठेवणे व त्याबाबत चौकशी करणे हे मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्य आहे.

अधिनियमाच्या कलम 12 मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाली नमूद केलेली सर्व कार्य आयोग करते.

अ) चौकशी :-पीडीताने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणीही सादर केलेल्या तक्रारीवरुन किंवा स्वत:हून किंवा न्यायालयाच्या आदेशावरुन आयोग खालील बाबतीत चौकशी करु शकतो

- मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा असे उल्लंघन होण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे.
- मानवी हक्कांचे असे उल्लंघन होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात हलगर्जीपणा झाला आहे.

ब) मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे / झाले आहे असे आरोप असलेल्या न्यायालयासमोर असलेल्या कोणत्याही खटल्यामध्ये न्यायालयाच्या अनुमतीने मध्यस्थी करणे;

क) त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यामध्ये काहीही तरतूद असली तरीही राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही संस्थेला, तुरुंगाला भेट देणे की जेथे माणसांना उपचारासाठी, सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी स्थानबद्ध केले आहे. सदर स्थानांमध्ये असलेल्या व्यक्तींसाठीच्या रहाण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करणे व त्याबाबत शिफारसी करणे यासाठी या भेटी दिल्या जातील;

ड) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनेमध्ये किंवा अन्य कोणत्याही कायद्यामध्ये कोणते सुरक्षा उपाय योजले आहेत याचा आढावा घेणे व त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचवणे;

इ) मानवी हक्कांचा उपभोग घेण्यात अडथळे आणणाऱ्या कोणत्याही घटकांचा, की ज्यात दहशतवादाचा समावेश आहे, आढावा घेणे व त्यावर उपाययोजना सुचवणे;

फ) मानवी हक्कांबाबत करार व अन्य आंतरराष्ट्रीय कागदपत्रे, उपाययोजना यांचा अभ्यास करणे व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी शिफारसी करणे;

ग) “मानवी हक्क” या क्षेत्रामध्ये संशोधन करणे व अशा संशोधनाला प्रोत्साहन देणे;

ह) समाजाच्या अनेक भागांमध्ये मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे व अशा हक्कांच्या रक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांची विविध माध्यमांकडून प्रसिद्धी, संमेलने व अन्य साधनांमधून करणे;

आय) “मानवी हक्क” या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटनांच्या व अन्य संघटनांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे;

ज) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी अन्य कोणतीही कार्ये.

**<u>आयोगाकडे तक्रार करतानाची कार्यपद्धती किंवा आयोग स्वत:हून कृती करील तेव्हाची कार्यपद्धती</u>**

1. मानवी हक्कांचा भंग झाल्याची तक्रार पीडीत व्यक्ती किंवा त्या व्यक्तीतर्फे अन्य व्यक्ती तक्रार दाखल करु शकेल. सदर तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत करता येईल. सदर तक्रार ऑनलाईन किंवा टपालाने सादर करता येईल.

2. तक्रार करताना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही, कोणतेही कोर्ट फी तिकीट लावावे लागणार नाही. वकील नेमण्याची गरज नाही.

3. कोणत्याही शासकीय सेवकांविरुद्ध तक्रार करायची असेल तर ती आयोगाच्या अध्यक्षांना उद्देशून करायची असते व त्यामध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे.
   - तक्रारदाराचे पूर्ण नाव
   - तक्रारदाराचा पूर्ण टपालाचा पत्ता
   - टेलिफोन क्रमांक / ई-मेल क्रमांक
   - घटनेची तारीख व स्थळ
   - घटना केव्हा घडली ती वेळ
   - मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांचा तपशील स्पष्ट करा.
   - कोणत्या शासकीय सेवकाविरुद्ध / शासकीय विभागाविरुद्ध / शासकीय संस्थेविरुद्ध / शासकीय प्राधिकरणाविरुद्ध तक्रार केली जात आहे?
   - सदर बाब कोणत्याही न्यायालयात, राष्ट्रीय मानव हक्क आयोगात, न्यायासनात किंवा अन्य वैधानिक मंचाकडे प्रलंबित आहे काय?
   - ज्या अनुतोषाची मागणी केली आहे तो अनुतोष

## आयोगाकडे येण्याचे फायदे

आयोगाकडे येणे - मानवी हक्क भंगाच्या बाबतीत पीडीत व्यक्तींना खर्चिक न्यायालयीन प्रतिनिधीत्व न करता न्याय मिळवण्यासाठी व नुकसान भरपाई मिळवण्यासाठी एक मंच राज्य मानवी हक्क आयोग पुरवतो.

**आयोगाकडे येणे** - मानवी हक्क भंगाच्या बाबतीत पीडीत व्यक्तींना खर्चिक न्यायालयीन प्रतिनिधीत्व न करता न्याय मिळवण्यासाठी व नुकसान भरपाई मिळवण्यासाठी एक मंच राज्य मानवी हक्क आयोग पुरवतो.

**जबाबदारी** - मानवी हक्कांच्या घटनांसाठी आयोग शासकीय अधिकार, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था व अन्य घटक यांना मानवी हक्क भंगासाठी जबाबदार धरु शकतो आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाईची शिफारस करु शकतो.

**समर्थन (advocacy)** - आयोग मानवी हक्कांचा वकील म्हणून शासकीय अधिकारी, नागरी समाजाच्या संस्था आणि सर्वसामान्य जनता यांच्याबरोबर मानवी हक्कांचे संरक्षण करणे व मानवी हक्क उचलून धरणे यासाठी व्यवहार करील.

**जनजागृती** - मानवी हक्कांबाबत सामाजिक जागृती निर्माण करुन आयोग मानवी हक्क भंगाच्या घटना भविष्यात थांबवण्याचा प्रयत्न करतो व मानवी हक्कांचा सन्मान करण्याच्या संस्कृतीची स्थापना करेल.

**तज्ज्ञत्व** - मानवी हक्क संबंधिताच्या कायद्याचे उत्तम ज्ञान असलेले अनुभवी कर्मचारी आयोगाकडे आहेत व ते तक्रार करणाऱ्यांना उचित मार्गदर्शन व आधार पुरवतात.

**अन्वेषण** - आयोग मानवी हक्क भंगाच्या घटनांचे अन्वेषण करु शकतो व त्यासाठी साक्षीदार व तज्ज्ञ यांना पुरावे, साक्ष व अभिप्रायासाठी आयोग बोलावू शकतो.

**प्रश्न सोडवणे** - मध्यस्थी आणि सलोखा याद्वारे मानवी हक्कासंबंधीचे विवाद सोडवणे व गाऱ्हाण्यांवर उपाय योजना शोधणे यासाठी आयोग एक मंच पुरवू शकतो.

**संरक्षण** - मानवी हक्क भंगाच्या बाबतीमध्ये आयोग पीडीत व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांना संरक्षण देऊ शकतो विशेषत: जेथे त्यांच्यावर सूड उगवला जाण्याची शक्यता असते.



वाय २६७६—३अ


## भाग 2 - विभाग आयोगाने हाताळलेल्या तक्रारी

दि.1 एप्रिल, 2022 ते दि.31 मार्च, 2023 या काळामध्ये आयोगाला एकूण 6,704 तक्रारी प्राप्त झाल्या. खालील तक्त्यामध्ये नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारी यांचा तपशील दिला आहे.


| आधी प्रलंबित असलेले खटले | नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी | सदर कालखंडातील एकूण तक्रारी | वर्षात एकूण निकालात काढलेल्या तक्रारी | सदर काळाच्या शेवटी प्रलंबित खटले |
|---|---|---|---|---|
| 22297 | 6157 | 28454 | 4604 | 23850 |


1 एप्रिल 2022 ते 31 मार्च 2023 या कालावधीत एकूण 28,454 प्रकरणे प्राप्त झाली, त्यापैकी 22,297 प्रकरणे पूर्वी प्रलंबित होती. या व्यतिरिक्त, वर्षभरात 4,604 प्रकरणे निकाली काढण्यात आले, या कालावधीच्या शेवटी एकूण 23,850 प्रकरणे प्रलंबित आहेत. प्राप्त झालेल्या ताज्या प्रकरणांची संख्या 6,157 होती, जी प्रणालीच्या कार्यभारात लक्षणीय वाढ दर्शवते. ही आकडेवारी प्रलंबित प्रकरणांची वाढती संख्या हाताळण्यासाठी आणि प्रणालीतील अनुशेष दूर करण्यासाठी कार्यक्षम आणि प्रभावी उपायांची आवश्यकता अधोरेखित करतात.

01.04.2022 ते 31.03.2023 पर्यंतच्या प्रकरणांचा बार आलेख



एकूण खटले - 28454








**एकूण मंजूर मदत = रु.47,91,000.00**

**घटनेच्या प्रकारानुसार तक्रारीची संख्या**

| घटनांची संख्या | नोंदल्या गेलेल्या घटना | निकालात काढलेल्या घटना |
|---|---|---|
| मुले | 105 | 10 |
| आरोग्य | 84 | 28 |
| तुरुंग | 326 | 27 |
| न्याय संस्था | 20 | 8 |
| माफिया / अंडरवर्ल्ड (गुन्हेगारांची वस्ती) | 18 | 9 |
| मजूर | 37 | 7 |
| अल्पसंख्यांक / अनुसूचित जाती / जमाती | 26 | 14 |
| पोलीस | 1561 | 748 |
| प्रदुषण / पर्यावरणशास्त्र / पर्यावरण | 24 | 7 |
| प्रादेशिक / जातीय हिंसाचार | 16 | 7 |
| सेवा बाबी | 473 | 273 |
| महिला | 144 | 45 |
| संकीर्ण | 3281 | 1978 |
| संरक्षण दल | 2 | 0 |
| अल्पवयीन / भिकारी यांचे घर | 24 | 3 |
| अनुसूचित जाती / जमाती / इतर मागासवर्गीय | 25 | 3 |

नोंदणी केलेली प्रकरणे आणि निपटारा केलेली प्रकरणे





प्राप्त झालेली माहिती नोंदणीकृत केलेल्या तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारींची संख्या दर्शविते. एकूण 3281 विविध तक्रारींपैकी 1978 निकाली काढण्यात आले आहेत, जी सर्व श्रेणींमध्ये सर्वाधिक आहे. पोलिस श्रेणीमध्ये सर्वाधिक 1561 गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी 748 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. बालक प्रवर्गात 105 प्रकरणे  नोंदविण्यात आली व 10 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला, तर आरोग्य प्रवर्गात 84 प्रकरणे नोंदविण्यात आली व 28 निकाली काढण्यात आली. न्यायप्रविष्ठ श्रेणीत 20 प्रकरणे नोंदविण्यात आली असून 8 निकाली काढण्यात आली आहेत. प्राप्त माहिती दर्शविते की तुरुंग, माफिया / अंडरवर्ल्ड, मजूर, अल्पसंख्याक / एससी / एसटी, प्रदूषण

/ पर्यावरणशास्त्र / पर्यावरण, धर्म / जातीय हिंसाचार, सेवाविषयक बाबी, महिला आणि एससी / एसटी / ओबीसी यासह बहुतांश श्रेणींमध्ये प्रकरणांचा लक्षणीय अनुशेष आहे.

**जिल्हानिहाय बाबींची नोंदणी व निपटारा**

| जिल्ह्याचे नाव | नोंदणी केलेले दावे | निकाली काढलेले दावे |
|---|---|---|
| अहमदनगर | 158 | 128 |
| अकोला | 51 | 39 |
| अमरावती | 99 | 77 |
| औरंगाबाद | 173 | 154 |
| बीड | 62 | 55 |
| भंडारा | 18 | 14 |
| बुलढाणा | 131 | 107 |
| चंद्रपूर | 67 | 49 |
| धुळे | 91 | 70 |
| गडचिरोली | 18 | 13 |
| गोंदिया | 46 | 39 |
| हिंगोली | 23 | 19 |
| जळगाव | 132 | 94 |
| जालना | 46 | 32 |
| कोल्हापूर | 91 | 75 |
| लातूर | 95 | 83 |
| महाराष्ट्र | 117 | 74 |
| मुंबई | 1635 | 1201 |
| नागपूर | 197 | 140 |
| नांदेड | 75 | 61 |
| नंदुरबार | 30 | 33 |
| नाशिक | 268 | 196 |
| नवी मुंबई | 150 | 94 |
| उस्मानाबाद | 48 | 27 |
| पालघर | 215 | 138 |


| | | |
|---|---|---|
| परभणी | 34 | 21 |
| पुणे | 567 | 460 |
| रायगड | 118 | 88 |
| रत्नागिरी | 35 | 24 |
| **जिल्ह्याचे नाव** | **नोंदणी केलेले दावे** | **निकाली काढलेले दावे** |
| सांगली | 97 | 55 |
| सातारा | 121 | 108 |
| सोलापूर | 210 | 122 |
| सिंधूदुर्ग | 36 | 26 |
| ठाणे | 731 | 559 |
| वर्धा | 48 | 42 |
| वाशिम | 42 | 25 |
| यवतमाळ | 82 | 62 |
| **एकूण** | **6157** | **4604** |



प्राप्त झालेली माहिती महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये नोंदणीकृत केलेल्या तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारींची संख्या दर्शविते. मुंबईत सर्वाधिक 1635 तक्रारी नोंदवल्या गेल्या असून त्यापैकी 1201 तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. पुण्यात 567 तक्रारी नोंदवल्या गेल्या आणि 460 तक्रारींचा निपटारा करण्यात आला. ठाण्यात 731 गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी 559 निकाली काढण्यात आले आहेत. सर्वात कमी तक्रारींची नोंद झालेल्या जिल्ह्यांमध्ये भंडारा असून तेथे 18 तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत, त्यानंतर गडचिरोली आणि सिंधुदुर्गमध्ये अनुक्रमे 18 आणि 36 नोंदवल्या गेल्या आहेत. सर्व जिल्ह्यांमध्ये एकूण 6157 नोंदविलेल्या तक्रारींची संख्या असून त्यापैकी 4604 तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. ही माहिती अनुशेष कमी करण्यासाठी आणि वेळेवर न्याय मिळण्याची खात्री करण्यासाठी तक्रारींचा अधिक कार्यक्षम आणि जलद निपटारा करण्याची गरज अधोरेखित करते.

न्यायालय क्र.1, 2 व 3 मध्ये एप्रिल, 2022 ते मार्च, 2023 पर्यंत एकूण निकाली काढलेल्या तक्रारी

| **कालावधी** | **लिमिने** | **सुओ-मोटो** | **सुनावणीनंतर** | **शिफारसी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल, 2022 ते मार्च, 2023 | 4977 | 216 | 2541 | 30 | 7770 |




प्राप्त झालेली माहिती 1 एप्रिल 2022 ते 31 मार्च 2023 या कालावधीत न्यायालय क्रमांक 1, 2 आणि 3 मध्ये निपटारा केलेल्या एकूण तक्रारींची संख्या दर्शविते. एकूण 7770 तक्रारींपैकी, सर्वात जास्त निपटारा करण्यात आलेल्या 4977 तक्रारी "लिमिने" श्रेणीत येतात. "सुनावणीनंतर" श्रेणीमध्ये 2541 तक्रारींचा निपटारा करण्यात आलेला आहे, तर "17 (आय) (ब)" मध्ये 216 तक्रारींचा निपटारा

करण्यात आलेला आहे. "शिफारशी" श्रेणीमध्ये सर्वात कमी फक्त 30 तक्रारींचा निपटारा करण्यात आलेला आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की, दिलेल्या कालावधीत तीन न्यायालयांमध्ये एकूण 7770 तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून न्यायालयाला लक्षणीय संख्येने खटले निकाली काढण्यात यश आले आहे. तथापि, न्यायालयांमध्ये अद्यापही प्रलंबित खटल्यांचा अनुशेष असून न्यायाचे जलद आणि कार्यक्षम वितरण सुनिश्चित करण्यासाठी त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.



(शा.म.मु.) वाय २६७६ —६ (५५ —७-२०२४)

## विभाग 3 - उदाहरणात्मक खटले

दरवर्षी मानवी हक्क भंगाच्या शेकडो बाबी राज्य मानवी हक्क आयोगाच्या निदर्शनाला आणून दिल्या जातात व त्या बाबींमधील पीडीत व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी आयोग सकारात्मक भूमिका निभावत आहे. या भागामध्ये अशा काही महत्वाच्या बाबींचा उल्लेख केला आहे की ज्यामध्ये आयोगाने उचित भूमिका निभावली आहे. महाराष्ट्र मानवी आयोग (पद्धती) नियम 2011 च्या कलम 11 मध्ये आयोगाला प्राप्त झालेल्या तक्रारी किंवा आयोगाने स्वत: होऊन कृती केलेल्या बाबींमध्ये करण्याच्या कार्यवाहीबाबत नमूद केले आहे की:- सर्वसाधारण (अ) राज्य आयोगाला तक्रारी सर्वसाधारणपणे मराठी, हिंदी किंवा इंग्रजीमध्ये करता येतील. (ब) तक्रार दाखल करण्यासाठी कोणतेही शुल्क घेतले जाणार नाही. (क) तक्रारदाराने बाबींचे संपूर्ण चित्र व तपशील दिला पाहिजे. राज्य मानवी हक्क आयोगाला आवश्यकता वाटली तर अधिक माहिती मागवेल व आवश्यकता असेल तर तक्रारीत केलेल्या आरोपीच्या समर्थनार्थ शपथपत्र दाखल करायला सांगतो.

### 1) **खटला क्र. 7015/2018**

**तक्रारदाराचे नाव -** शाहू शिवाजी मोकाशी

**प्रतिवादीचे नाव** - सदस्य सचिव, कर्नाटक राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळ

**आदेशाचा दिनांक** - 30 सप्टेंबर, 2022

**कोरम** - एम.ए. सईद - सदस्य

**विषय - नदीचे प्रचंड प्रदूषण**

**खटल्याचे स्वरुप -** साखर कारखान्याने त्यांचे पदार्थ (सांडपाणी) (कचरा) नदीमध्ये टाकल्याने नदीमध्ये प्रचंड प्रदूषण झाल्याबाबत तक्रार करण्यात आली होती. सदर प्रदूषणामध्ये नागनूर या खेड्यामधील रहिवाशांचा स्वच्छ व आरोग्यदायक पाणी वापरण्याचा हक्क हिरावून घेतला गेला व हा मानवी हक्कांचा भंग आहे. तपासणीमध्ये असे आढळून आले की, सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे संयंत्र हे नदीत सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अपुरे आहे व त्या संयंत्राचा दर्जाही सुधारला गेला नव्हता. त्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्राच्या इक्वलायझेशन टाकीजवळच्या नाल्यात सोडली गेली होती व प्रक्रिया न केलेले सांडपाणी हिरण्यकेशी नदीत सोडले गेले होते. असेही आढळून आले होते की, त्यांनी केंद्रीय नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार उरलेली यार्डस् बांधली नव्हती.

स्वच्छ पाणी प्राप्त करण्याचा हक्क हा अन्न प्राप्त करण्याचा हक्क, स्वच्छ वातावरण प्राप्त करण्याचा हक्क व आरोग्याचा हक्क यामध्ये काढता येतो. हे सर्व हक्क घटनेच्या कलम 21 मध्ये जाण्याचा हक्क या अंतर्गत येतात. त्याच बरोबर संबंधित तरतुदी कलम 3 (ब), कलम 47, 51(अ) कलम (ग) व शेवटी कलम 262 आहेत.

**शिफारस -** कर्नाटक प्रदूषण नियंत्रण मंडळात संबंधित साखर कारखान्याने केलेल्या चुका व त्रुटींबाबत योग्य पावले उचलून सदर कारखान्याकडून उचित बाबींची योग्य पूर्तता करुन घ्यावी असा आयोगाने आदेश दिला. आयोगाने मंडळाला असाही आदेश दिला की त्यांनी साखर कारखान्याविरुद्ध प्रथम माहिती अहवाल सादर करुन भारतीय दंड विधानाच्या संबंधित कलमां अंतर्गत साखर कारखान्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा व व्यवस्थापनाविरुद्ध कारवाई करावी. सदर साखर कारखान्याकडून रु. 1,00,000/- वसूल करुन कोल्हापूर पंचायत समितीस दिली की ज्याद्वारे खेड्यातील पायाभूत सुविधा सुधारता येतील.

**2) खटला क्र. 1289/13/16/2020**

**तक्रारदाराचे नाव -** रुपेश आबा राणे, बोरीवली

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस उप आयुक्त, विभाग 11, मुंबई

**आदेशाचा दिनांक** - 1 नोव्हेंबर, 2022

**कोरम** - एम.ए. सईद - सदस्य

**विषय -** पोलीस ठाण्यावर अमानूष वागणूक दिली जाणे

**खटल्याचे स्वरुप -** तक्रारदाराच्या मेहुणीचे (त्याच्या बायकोची धाकटी बहीण) आपल्या पतीबरोबरचे वैवाहिक संबंध बिघडले असल्याने ती आपल्या नवऱ्याला सोडून गेली आहे व ती तक्रारदाराबरोबर आपल्या मुलाबरोबर रहात आहे. ती प्रश्नांकित दुर्दैवी घटनेपूर्वी नऊ महिन्यापासून तक्रारदाराबरोबर राहते. तिचा पती मध्यरात्रीनंतर पोलीस स्टेशनला गेला व त्याने आपली बायको त्याच्या फोन कॉलला उत्तर देत नाही व दरवाजा उघडत नाही अशी तक्रार केली. तेव्हा तक्रारदार व त्याच्या मेहुणीला पोलीस ठाण्यावर बोलावले व त्यानंतर पर्यवेक्षक प्राधिकारी यांनी केलेल्या विभागीय चौकशीमध्ये असे आढळून आले की, तक्रारदार व त्याच्या मेहुणीला अमानवी वागणूक सहन करावी लागली.

**शिफारस -** तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यामुळे त्यांना रु.2,00,000/- इतकी नुकसान भरपाई अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी द्यावी अशी आयोगाने शिफारस केली. तसेच पोलीस अधिकाऱ्यांच्या अधिकाराचा गैरवापर नियंत्रणात आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वे घालून

द्यावीत. त्यात पुढील गोष्टीमध्ये लक्ष केंद्रीत करावे - कृतीची पारदर्शकता, जबाबदारी, योग्य कार्यसंस्कृती विकसित करणे, मूळ मानवी हक्कांबरोबर सुसंगत असे पोलीस दलाचे प्रशिक्षण व अभिमुखता, पोलीस दलांच्या प्रशिक्षणाची पुनर्रचना करणे, पोलिसांना मानवी मूल्ये शिकवणे व त्यांना संविधानातील मूल्यांबाबत संवेदनशील करणे.

**3) खटला क्र. 1620/2018**

**तक्रारदाराचे नाव -** संतोष एम. राऊत

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस आयुक्त, ठाणे - 400 601

**आदेशाचा दिनांक** - 18 एप्रिल, 2022

**कोरम** - एम.ए. सईद - सदस्य

**विषय -** पोलीसांनी शारीरिक व मानसिक छळ करणे

**खटल्याचे स्वरुप -** पोलिसांच्या अंमलबजावणी संचालनालय युनिट, ठाणे यांनी आपल्याला मानसिक व शारीरिकरीत्या छळले आहे असे गाऱ्हाणे तक्रारदार घेऊन आले. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना तक्रारदाराविरुद्ध एक निनावी तक्रार आली की त्यांनी एक गँगस्टरातर्फे बांधकाम व्यावसायिकांकडून खंडणी उकळली. पोलीस अधिकाऱ्याने तक्रारदाराविरुद्ध प्रथम दर्शनी अहवाल नोंदून न घेता त्यांना उलट तपासणीसाठी अंमलबजावणी संचालनालय युनिटमध्ये बोलावले व त्यांचे पारपत्र जप्त केले. तथाकथित खबरीने तक्रारीत दिलेल्या पत्त्यावर तो खबरी आढळून आला नाही. अंमलबजावणी संचालनालयाची टीम त्या खबरीचा मागोवा काढू शकली नाही. तक्रारदार या गुन्ह्यात आपण निर्दोष असल्याचे सांगत असले तरी तक्रारदाराला पोलीस अधिकारी अंमलबजावणी संचालनालय युनिट मध्ये बोलवतच राहीले व त्याला प्रश्न विचारत राहीले.

**शिफारशी -** हा आदेश प्राप्त झाल्यापासून तक्रारदाराला त्याच्या मानवी हक्कांच्या भंगासाठी रु.1,00,000/- द्यावेत. अन्यथा त्याला आदेशाच्या तारखेपासून प्रदान होईपर्यंत 12% व्याज द्यावे लागेल. अतिरिक्त सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदर रक्कम उप पोलीस निरीक्षक महाजन यांच्याकडून वसूल करावी. उपरोक्त आदेशाचे पालन झाले असल्याची खात्री करावी. तसेच श्री. महाजन यांच्याविरुद्ध शिस्त भंगाची कारवाई करण्याचा विचार करावा. कारण श्री. महाजन त्यांना मिळालेल्या अधिकाराच्या मर्यादा ओलांडल्या. सदर कारवाई ही कडक संकेत असेल. तो पोलिसांच्या संघात शेवटपर्यंत झिरपत जावा की त्यांची कर्तव्ये पार पडताना त्यांनी मानवी हक्कांचे व कायद्याचे ठळकपणे दिसणारे उल्लंघन केले तर होणारे परिणाम गंभीर असतील. पोलीस महासंचालक यांनी वेळोवेळी महाराष्ट्रातील पोलीस दलासाठी संवेदनशीलता व जागरुकता प्रशिक्षण

आयोजित करावे. त्यामध्ये पद्धती घालून देणाऱ्या कायद्याच्या तरतुदी, पोलिसांच्या अधिकारांबद्दल उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी पारित केलेला महत्वाचा निकाल आदेश यांच्यावर सदर प्रशिक्षण आधारित असावे ज्या कायद्यांचे पालन राज्याच्या नागरिकांसाठी करणे त्यांचे कर्तव्य आहे त्याचे प्रशिक्षण पोलिसांनी घ्यावे.

**4) खटला क्र. 1155/13/16/2022/255**

**तक्रारदाराचे नाव -** शहनाज बानो एहसान अली शाह

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस उप आयुक्त, विभाग 6, मुंबई

**आदेशाचा दिनांक** - 10 जानेवारी, 2023

**कोरम** - न्यायाधीश के.के. तातेड - अध्यक्ष

**विषय -** पोलीस अधिकाऱ्यांनी कार्यवाही न करणे

**खटल्याचे स्वरुप -** तक्रारदारांनी अशी तक्रार केली की, पोलीस अधिकाऱ्यांनी भारतीय दंड विधानाच्या कलम 376 च्या अंतर्गत कार्यवाही केली नाही व अशी कार्यवाही करण्याकडे दुर्लक्ष केले. तिची तक्रार अशी होती की चार व्यक्तींनी तिचा वारंवार लैंगिक छळ केला. इतकेच नव्हे तर तिच्यावर बलात्कार केल्याच्या चित्रफीती तयार केल्या. अर्जदाराने असे सादर केले की, ति वेळोवेळी पोलीस अधिकाऱ्यांकडे गेली. परंतु पोलीस अधिकाऱ्यांनी तिची प्रथम दर्शनी खबर नोंदवून घेतली नाही किंवा कोणतीही कृती केली नाही. जेव्हा तिने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधला, तेव्हा त्यांनी भारतीय दंड विधान कलम 376, 376(2) (एच) (एन) 376 (डी), 506 आणि 34 या कलमांखाली गुन्हा दाखल केला.

**शिफारसी -** अतिरिक्त मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, गृह मंत्रालय, मुंबई आणि उप आयुक्त पोलीस विभाग-6, मुंबई यांना असा आदेश दिला जात आहे की, ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी भारतीय दंड विधान कलम 376 अंतर्गत प्रथम माहिती अहवाल दाखल केला नाही व त्याबाबत निष्काळजीपणा दाखवला त्यांच्याविरुद्ध चौकशी करावी व उचित कारवाई करावी तसेच त्यांना असा आदेश दिला जातो की त्यांनी या आदेशापासून दोन महिन्याच्या आत रु.2,00,000/- इतकी नुकसान भरपाई पीडीतांना द्यावी. कार्यालयाला असा ही आदेश दिला जात आहे की त्यांनी तक्रारदाराला व पोलीसांना या आदेशाची प्रत मोफत द्यावी व उपरोक्त शिफारसीची पूर्तता मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या कलम 18 सहपठित महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) नियम 2011 नुसार करावी. आयोगाचे माननीय सचिव यांच्या कार्यालयाने या आदेशाच्या पूर्ततेचा पाठपुरावा करावा. उपरोक्त शिफारस करुन सदर तक्रारींचा निपटारा केला जात आहे.

**5) खटला क्र. 4360/13/12/2021**

**तक्रारदाराचे नाव -** भारती बी. महाजन, काजगांव, ता. जि. जळगाव

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस अधिक्षक, जळगाव

**आदेशाचा दिनांक** - 22 जुलै, 2022

**कोरम** - न्यायाधीश के.के. तातेड - अध्यक्ष

**विषय -** पोलीस अधिकारी राजकीय दबावाखाली काम करीत आहेत.

**खटल्याचे स्वरुप -** तक्रारदारांचे स्वरुप असे आहे की, पोलीस अधिकाऱ्यांनी राजकीय व्यक्तींच्या दबावाखाली येऊन गुन्हेगारांविरुद्ध प्रथम दर्शनी अहवाल बदलला. तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, तक्रारीमध्ये लिहिल्यानुसार प्रतिवादीची वागणूक ही महिलांचा विनयभंग करणारी आहे ही एकच बाब अशी नाही की जी लैंगिक छळ म्हणून समजली जाईल.

या कार्यालयाच्या सूचनेनुसार सदर प्रश्नांकित पोलीस ठाण्याला हुकूम (subpoena) जारी करण्यात आला होता व त्याद्वारे त्यांना याबाबतचे अन्वेषण करुन अहवाल सादर करण्यास सांगितले होते. पोलीस अधिकाऱ्यांनी अन्वेषण करुन आपला अहवाल दि.06.04.2022 रोजी जारी केला आहे. पोलीस विभागाचा मुख्य दावा असा आहे की, याबाबतीत काहीच घडले नाही. पोलीस विभागाचा असा दावा आहे की, अर्जदारांनी केवळ प्रथम दर्शनी अहवाल प्राप्त करण्यासाठी प्रतिवादी विरुद्ध असा आरोप केला आहे. पोलीस विभागाने असे कळवले आहे की, त्यांनी याबाबत या पूर्वीच गुन्हा (एनसी) नोंदला आहे. सर्व जबाब सहा. पोलीस निरीक्षक श्री. नागरे यांनी भडगाव पोलीस स्टेशन येथून नोंदले आहे. केवळ हा जबाब वाचला तरी अर्जदाराच्या विधानाला आधार प्राप्त होतो. उदाहरणार्थ कुमारी सिंधूबाई केशव महाजन यांनी आपल्या जबाबात असे म्हटले आहे की, तिने असे पाहिले की आरोपीने अर्जदाराचा ब्लाऊज व साडी लोकांसमोर फाडली. एवढेच नाही तर काही प्रतिवादींनी अर्जदाराचा संपूर्ण ब्लाऊज अर्जदाराच्या अंगावरुन काढून टाकला व अर्जदाराने आपले हात आपल्या छातीवर ठेवले.

**शिफारसी -** अ) अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग आणि / किंवा पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी हा आदेश प्राप्त झाल्यावर दोन महिन्याच्या आत तक्रारदाराला रु.2,00,000/- (रुपये दोन लाख मात्र) नुकसान भरपाई द्यावी. अन्यथा तक्रारदाराला या आदेशाच्या तारखेपासून 9% व्याज द्यावे लागेल.

ब) लोणार पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्री. गजानन धोंगडे बक्कल नंबर 1561 व पोलीस अधिकारी प्रदीप खंडू ठाकूर यांच्याविरुद्ध पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी विभागीय चौकशी चालू ठेवावी.

क) उपरोक्त नुकसान भरपाई रु.2,00,000/- देण्यासाठी कोण जबाबदार आहे ते पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी ठरवावे व त्यानुसार जबाबदार व्यक्तीकडून ती जमीन महसूल न्यायालयात व्याख्या दिल्याप्रमाणे जमीन महसूल म्हणून वसूल करावी.

ड) उपरोक्त सूचनांची पूर्तता मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 कलम 18 (इ) सहपठित महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (पद्धती) नियम 2011 नियम 22 ते 24 यानुसार करावी.

इ) आयोगाचे मा. सचिव यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा पाठपुरावा करावा.

**6) खटला क्र.1492/13/8//2022**

**तक्रारदाराचे नाव -** अभिमन्यू श्रीराम जाधव, रा. चिंचली सांगले, ता. लोणार, जिल्हा बुलढाणा

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस अधिक्षक, बुलढाणा

**आदेशाचा दिनांक** - 27 सप्टेंबर, 2022

**कोरम** - न्यायाधीश के.के. तातेड - अध्यक्ष

**विषय -** पोलीसांनी कृती न करणे.

**खटल्याचे स्वरुप -** लोणार पोलीस स्टेशनने तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीबाबत कोणतीही कृती केली नाही तसेच आरोपीविरुद्ध कोणतीही कृती केली नाही. तक्रारदाराने असे नमूद केले की, पोलीस अधिकारी यांनी निष्काळजीपणे चौकशी केली नाही व तक्रारदाराच्या मुलाच्या मृत्यूबाबत गुन्हा नोंदला गेला नाही.

**शिफारसी -** अ) अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग आणि / किंवा पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी हा आदेश प्राप्त झाल्यावर दोन महिन्याच्या आत तक्रारदाराला रु.2,00,000/- (रु. दोन लाख मात्र) नुकसान भरपाई द्यावी. अन्यथा तक्रारदाराला या आदेशाच्या तारखेपासून 9% व्याज द्यावे लागेल.

ब) लोणार पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्री. गजानन धोंगडे बक्कल नंबर 1561 व पोलीस अधिकारी प्रदीप खंडू ठाकूर यांच्याविरुद्ध पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी विभागीय चौकशी चालू ठेवावी.

क) उपरोक्त नुकसान भरपाई रु.2,00,000/- देण्यासाठी कोण जबाबदार आहे ते पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी ठरवावे व त्यानुसार जबाबदार व्यक्तीकडून ती जमीन महसूल न्यायालयात व्याख्या दिल्याप्रमाणे जमीन महसूल म्हणून वसूल करावी.

ड) उपरोक्त सूचनांची पूर्तता मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 कलम 18 (इ) सहपठित महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (पद्धती) नियम 2011 नियम 22 ते 24 यानुसार करावी.

इ) आयोगाचे मा. सचिव यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा पाठपुरावा करावा.

**निष्कर्ष -** महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाने वर्ष 2022-23 या वर्षामध्ये हाताळलेल्या काही बाबी आहेत. तक्रारदारांना न्याय देण्यात आयोगाने केलेल्या शिफारसींची फार महत्वाची भूमिका आहे.

वार्षिक अहवालामध्ये उदाहरणार्थ दिलेल्या बाबींचा आयोगाला अनेक कार्यासाठी उपयोग होतो. तसेच वाचकांना ही उपयोग होतो. त्यामध्ये परिणामांचे प्रदर्शन करणे, संदर्भ पुरवणे, खटले दाखवणे व स्वारस्यधारकांना गुंतवून ठेवणे यांचा समावेश होतो. आयोग लोकांच्या आयुष्यामध्ये कसा फरक घडवून आणतो याची उदाहरणे देऊन या अहवालाने स्वारस्यधारकांना आयोगाचे कार्य समजावून सांगितले व त्याची किंमत समजवून सांगितली. कधी कधी आयोगाचे कार्य किचकट, गुंतागुंतीचे व समजायला अवघड असू शकते आणि उदाहरणार्थ दिलेले खटले यामुळे स्वारस्यधारकांना आयोगाच्या कामाचे प्रत्यक्ष आयोगाचे परिणाम दिसून आले. आयोगाने यशस्वी प्रकल्प व यशस्वी पुढाकार दाखवून या अहवालाने आपली विश्वासार्हता वाढवली आहे व आयोगाने प्राप्त केलेल्या यशाचे प्रदर्शन केले आहे. हे आयोगाबाबत विशेष महत्वाचे आहे. ज्या लोकांची आयोग सेवा करतो त्यांचा विश्वास व आधार आयोगाला महत्वाचा आहे. उदाहरणार्थ दिलेल्या खटल्यांमुळे वाचकांना हा अहवाल अधिक संपूर्ण झाला आहे असे वाटेल व तो वाचण्याकडे त्यांचा कल राहील. सत्य घटना व उदाहरणे अहवालामध्ये देऊन या अहवालाने स्वारस्यधारकांना अधिक वैयक्तिक पातळीवर जोडले आहे. त्यामुळे अंततः महाराष्ट्रामध्ये मानवी हक्कांबाबत अधिक जागरुकता निर्माण झाली आहे व पाठिंबा मिळत आहे.

## विभाग 4

## आयोगाने दिलेल्या भेटी

मानवी हक्क आयोगाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 12 (क) नुसार आयोगाला असा आदेश आहे की, आयोगाने राज्य सरकारला पूर्वसूचना देऊन आयोगाने अशा ठिकाणी भेटी द्यायला हव्यात की जेथे राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील ज्या जागेमध्ये व्यक्ती उपचारासाठी, सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी ठेवल्या आहेत. आयोगाने अशा ठिकाणी भेटी देऊन तेथे राहाणाऱ्या व्यक्तीच्या परिस्थितीचा अभ्यास करावा व त्याबाबत शिफारसी कराव्यात.

त्यानुसार आयोगाचे मा. अध्यक्ष, सचिव व अन्वेषण विभागाचे प्रमुख पोलिसांचे विशेष महानिरीक्षक, निबंधक व अन्य कर्मचाऱ्यांनी भेटी दिल्या.

| अ.क्र. | भेटीचा दिनांक | जिल्हा | भेटीचे ठिकाण | भेटीचा प्रकार | भेट देणारा गट |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 01.04.2022 | पुणे | फरासखाना पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 2. | 09.04.2022 ते 01.05.2022 | नाशिक | महाराष्ट्र पोलीस अकॅडमी | संवेदना | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 3. | 13.04.2022 | पिंपरी चिंचवड | चाकण पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 4. | 25.04.2022 | अकोला | पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 5. | 09.05.2022 | पुणे | भोसरी पोलीस स्टेशन | | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 6. | 31.05.2022 ते 01.06.2022 | बीड | जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालय, गेवराई, बीड | नियोजित / चौकशी | विशेष पोलीस महानिरीक्षक आणि पोलीस निरीक्षक |
| 7. | 31.05.2022 | ठाणे | काशी मीरा पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 8. | 22.06.2022 ते 23.06.2022 | वर्धा | महारोगी सेवा संघ समितीचे कार्यालय | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक आणि पोलीस निरीक्षक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9. | 01.07.2022 | नवी मुंबई | सिडको कार्यालय, उरण नवी मुंबई | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक |
| 10. | 08.07.2022 | मुंबई | शासकीय रुग्णालय, कांदिवली | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 11. | 15.07.2022 | मुंबई | ऑर्नेट ब्लॉसम सीएचएस, दादर | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 12. | 18.07.2022 | पुणे | शिवाजी नगर पोलीस स्टेशन | नियोजित | प्रबंधक, पोलीस अधीक्षक, १ हवालदार |
| 13. | 11.08.2022 | मुंबई | भिक्षेकरुंचे घर मानखुर्द (शासकीय पुरुष भिक्षेकरु रिसिव्हिंग केंद्र, चेंबूर) | नियोजित | प्रबंधक, 20 प्रो बोनो विधी शाखा विद्यार्थी |
| 14. | 11.08.2022 | मुंबई | भिक्षेकरुंचे घर मानखुर्द (शासकीय पुरुष भिक्षेकरु रिसिव्हिंग केंद्र, चेंबूर) | नियोजित | प्रबंधक, 20 प्रो बोनो विधी शाखा विद्यार्थी |
| 15. | 30.08.2022 | मुंबई | अर्जदारांचे निवासस्थान, बोरिवली | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 16. | 01.09.2022 | मुंबई | अर्जदारांचे निवासस्थान, मालाड | नियोजित / चौकशी | विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 17. | 13.09.22 | औरंगाबाद | जवाहरनगर पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 18. | 14.09.22 ते 15.09.22 | नाशिक | अर्जदारांचे निवासस्थान आणि पंचवटी पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 19. | 16.09.22 | सिंधुदुर्ग | पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग | नियोजित / चौकशी | विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 20. | 24.09.22 | मुंबई | मानसिकदृष्ट्या कमकुवत मुलांसाठी घर, मानखुर्द, मुंबई. | नियोजित | प्रबंधक, 20 प्रो बोनो विधी शाखा विद्यार्थी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21. | 26.09.22 | पुणे | हिंजेवाडी, पोलीस स्टेशन | | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 22. | 27.09.22 | मुंबई | अर्जदारांचे निवासस्थान, मालाड | नियोजित / चौकशी | विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 23. | 21.10.22 | मुंबई | नागपाडा | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 24. | 10.11.22 | रायगड | श्रीवर्धन पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक |
| 25. | 06.12.22 | ठाणे | आधारवाडी कारागृह, कल्याण | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 26. | 09.01.23 | नागपूर | मध्यवर्ती कारागृह, नागपूर | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक |
| 27. | 16.01.23 | नाशिक | सीपी, नाशिक कार्यालय | संवेदना | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 28. | 16.01.23 | मुंबई | कुलाबा पोलीस स्टेशन | नियोजित | सहाय्यक प्रबंधक, एक कर्मचारी सदस्य आणि हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रम 2022 मधील 25 विद्यार्थी |
| 29. | 17.01.23 | ठाणे | कल्याण आधारवाडी कारागृह | नियोजित | प्रबंधक, हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रम 2022 मधील 25 विद्यार्थी |
| 30. | 24.01.23 | मुंबई | उमरखाडी बाल न्याय मंडळ | नियोजित | प्रबंधक, हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रम 2022 मधील 25 विद्यार्थी |
| 31. | 25.01.23 | मानखुर्द | मुलांची मदत संस्था | | सहाय्यक प्रबंधक, हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रम 2022 मधील 25 विद्यार्थी |
| 32. | 25.01.23 | मुंबई | वात्सल्य वृद्धाश्रम, कांजूरमार्ग | नियोजित | प्रबंधक, हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रम 2022 मधील 25 विद्यार्थी |
| 33. | 28.01.23 | मुंबई | प्रयास, एनजीओ | नियोजित | प्रबंधक, हिवाळी इंटर्नशिप कार्यक्रम 2022 मधील 25 विद्यार्थी |
| 34. | 06.02.23 | ठाणे | प्रादेशिक मानसिक रुग्णालय, ठाणे | नियोजित | प्रबंधक |
| 35. | 10.02.23 | सोलापूर | जिल्हा कारागृह, सोलापूर | नियोजित / चौकशी | पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 36. | 01.03.23 ते | नागपूर | गणेश पेठ पोलीस स्टेशन | नियोजित / चौकशी | पोलीस अधीक्षक आणि कर्मचारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 02.03.23 | | | | |
| 37. | 10.03.23 | मुंबई | अंजुमन-इ- इस्लामचे बॅरिस्टर ए.आर. अंतुले लॉ कॉलेज | | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 38 | 11.03.23 | मुंबई | चिल्ड्रन वेलफेअर सेंटर लॉ कॉलेज | | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 39. | 18.03.23 | ठाणे | प्रादेशिक मानसिक रुग्णालय, ठाणे | | मा. अध्यक्ष न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. के.के. तातेड,<br>मा. सदस्य श्री. एम.ए. सईद, प्रबंधक, संलग्न कार्यक्रमातून 12 विद्यार्थी |
| 40. | 21.03.23 | मुंबई | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मुंबई | | प्रबंधक, संलग्न कार्यक्रमातून 15 विद्यार्थी |
| 41. | 27.03.23 | ऑनलाईन | एनएचआरसी - ऑनलाइन लॉ इंटर्न्स | | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 42. | 27.03.23 | ठाणे | श्री नकोडा कर्ण बधीर विद्यालय, सरावली गाव, गोवे नाका, भिवंडी- कल्याण रस्ता, भिवंडी | | प्रबंधक, संलग्न कार्यक्रमातून 15 विद्यार्थी |

त्यानुसार आयोगाचे मा. अध्यक्ष, सचिव व अन्वेषण विभागाचे प्रमुख पोलिसांचे विशेष महानिरीक्षक, निबंधक व अन्य कर्मचाऱ्यांनी भेटी दिल्या.

| अ.क्र. | भेटीचा दिनांक | जिल्हा | भेटीचे ठिकाण | भेटीचा प्रकार | भेट देणारा गट |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 03.04.2022 | पुणे | चाकण पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 2. | 25.04.2022 | सातारा | सातारा तालुका पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 3. | 26.04.2022 | पुणे | राजगड पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 4. | 04.07.2022 | संगमनेर | तालुका पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 5. | 05.07.2022 | अहमदनगर | अकोले पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 6. | 20.08.2022 | अमरावती | अमरावती मध्यवर्ती कारागृह | अचानक | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 7. | 27.08.22 | पुणे | वेल्हे पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 8. | 29.08.22 | अहमदनगर | घारगाव पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 9. | 30.08.22 | रायगड | परम शांतीधाम वृद्धाश्रम तळोजा, रायगड | नियोजित | प्रबंधक, 20 प्रो बोनो विद्यार्थी |
| 10. | 01.10.22 | ठाणे | ठाणे मध्यवर्ती कारागृह | अचानक | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 11. | 04.10.22 | मुंबई | जे.जे. हॉस्पिटल, मुंबई | नियोजित | प्रबंधक, पोलीस अधीक्षक, संलग्न कार्यक्रमातून 6 विद्यार्थी |
| 12. | 07.10.22 | नागपूर | नागपूर मध्यवर्ती कारागृह | अचानक | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 13. | 21.10.22 | अहमदनगर | सुपा पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 14. | 21.10.22 | अहमदनगर | कोतवाली पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 15. | 22.10.22 | पुणे | नारायणगाव पोलीस स्टेशन | अचानक | मा. सदस्य श्री. भगवंतराव मोरे |
| 16. | 08.02.23 ते 11.02.23 | कोल्हापूर | कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह | अचानक | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 17. | 20.02.23 | मुंबई | कांदिवली | अचानक | पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 18. | 21.02.23 | अहमदनगर | भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन | अचानक | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |

अचानक किंवा अनियोजित भेटी व नियोजित भेटी या शासन नागरिकांच्या मानवी हक्कांचे पालन कितपत करते हे तपासण्याचे साधन आहे.

मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायद्याद्वारे शासित उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारच्या जबाबदारीची पुष्टी करण्यासाठी अचानक / अनियोजित भेट हे एक प्रभावी माध्यम आहे.

मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या कायद्यामध्ये ज्या तरतुदी केल्या आहेत त्यांच्या पूर्ततेसाठी शासकीय संस्थांनी कोणती पावले उचलली आहेत ते तपासण्यासाठी व त्याची देखरेख करण्यासाठी नियोजित भेटी हा प्रभावी मार्ग आहे.

## विभाग 5

## जनजागृती कार्यक्रम

1993 मध्ये आयोगाची निर्मिती झाल्यापासून, आयोगाला मानवी हक्क शिक्षण या विषयात रस आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 चे कलम 12 (एच) नुसार आयोगाला समाजाच्या विविध घटकांमध्ये मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करण्यास आणि प्रकाशन, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे आणि इतर उपलब्ध माध्यमातून या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांबद्दल जागरूकता वाढवणे अनिवार्य आहे आणि

कलम 12 (आय) आयोगाला मानवी हक्काच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अशासकीय संघटना आणि संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिकार देते.

**आयोगाने आयोजित केलेले जनजागृती कार्यक्रम -**

| अ.क्र. | जनजागृती कार्यक्रमाचा प्रकार | एकूण |
|---|---|---|
| 1. | इंटर्नशीप | 25 |
| 2. | प्रो बोनो | 51 |
| 3. | सहयोग / संलग्न कार्यक्रम | 30 |

**विद्यार्थ्यांनी आयोगाला दिलेल्या भेटी -**

| अ.क्र. | दिनांक | संस्थेचे नाव | सहभागींची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 15/09/2022 | कर्नाटक विधी महाविद्यालय, मुंबई | 15 पदवीपूर्व विधी विद्यार्थी |
| 2. | 27/09/2022 | इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, मुंबई | 10 पदव्युत्तर नर्सिंग विद्यार्थी |
| 3. | 28/09/2022 | पार्वतीबाई जोंधळे महिला विधी महाविद्यालय, मुंबई | 20 पदवीपूर्व विधी विद्यार्थी |
| 4. | 26/09/2022<br>29/09/2022<br>30/09/2022 | सिद्धार्थ विधी महाविद्यालय, मुंबई | 60 पदवीपूर्व विधी विद्यार्थी |
| 5. | 10/03/2023<br>17/03/2023<br>24/03/2023<br>31/03/2023 | पार्वतीबाई जोंधळे महिला विधी महाविद्यालय, मुंबई | 80 पदवीपूर्व विधी विद्यार्थी |

**सिव्हिल सोसायटी संस्थेने आयोगाला दिलेली भेट -**

| अ.क्र. | दिनांक | संस्था | सहभागींची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 03.03.2023 | हर्ट (मानवी हक्क) फाउंडेशन, मुंबई | एनजीओ चे 8 प्रशिक्षणार्थी |

**परिविक्षा अधिकाऱ्यांनी दिलेली भेट**

| अ.क्र. | दिनांक | संस्था | सहभागींची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 24.02.2023 | 2021 बॅचचे भाप्रसे अधिकारी परिविक्षा प्रशिक्षणार्थी | 10 भाप्रसे अधिकारी |

**इतर भेटी / धर्मादाय**

मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 चे कलम 12(आय) आणि 12 (जे) आयोगाला मानवी हक्काच्या क्षेत्रात काम करणाऱ्या गैर-सरकारी संस्थांच्या (एनजीओ) प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिकार देते आणि मानवी हक्कांच्या संवर्धनासाठी आवश्यक वाटेल अशी इतर कार्ये करते.

| अ.क्र. | दिनांक | थीम | कार्यक्रमाचे ठिकाण | उद्देश | संघ |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 15.10.2022 | दिवाळी स्नेह मेळावा | हेतू चॅरिटेबल ट्रस्ट | 850 दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व अभ्यास साहित्य, मिठाई वाटप | आयोग, प्रबंधक, आणि संलग्न कार्यक्रमातील 11 विद्यार्थी |
| 2. | 01.10.2022 | वैद्यकीय शिबिर | ठाणे मध्यवर्ती कारागृह | त्वचारोगासाठी वैद्यकीय शिबिर | आयोग आणि 1 कर्मचारी सदस्य, संलग्न कार्यक्रमातील 11 विद्यार्थी आणि 2 प्राध्यापक |
| 3. | 31.10.2022 | राष्ट्रीय एकता दिवस | आर्थर रोड मध्यवर्ती कारागृह | पुस्तके आणि 3 वेगवेगळ्या भाषांच्या पुस्तकांचे वितरण. एकूण 81 पुस्तकांचे वाटप | आयोग, प्रबंधक, अधिकारी, कर्मचारी आणि 6 प्रो बोनो विद्यार्थी |

**<u>कार्यशाळा आणि परिषद</u>**

| अ.क्र. | दिनांक | भेटीचे ठिकाण | जिल्हा |
|---|---|---|---|
| 1. | 10/04/2022 | एक कार्यक्रम बौना आणि दिव्यांग बच्चो के नाम | मुंबई |
| 2. | 30/04/2022 | महाराष्ट्र पोलीस अकादमी येथे एक दिवसीय कार्यशाळा | नाशिक |
| 3. | 11/06/2022 | दत्तक मुलांना शिष्यवृत्ती आणि वह्या वाटप | मुंबई |
| 4. | 30/06/2022 ते 01/07/2022 | राष्ट्रीय परिषद - राष्ट्रीय मानवी हक्क आयोगातर्फे आयोजित भारतीय संस्कृती आणि तत्वज्ञानातील मानवी हक्क | नवी दिल्ली |
| 5. | 06/08/2022 | तामिळनाडू राज्य मानवी हक्क आयोगातर्फे आयोजित रौप्य महोत्सवी सोहळा | तामिळनाडू |
| 6. | 11/10/2022 ते 12/10/2022 | राष्ट्रीय मानवी हक्क आयोग आयोजित स्थापना दिन | नवी दिल्ली |
| 7. | 12/11/2022 | HETU चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित 75 वी प्लॅटिनम ज्युबली | मुंबई |
| 8. | 21/12/2022 आणि 22/12/2022 | केरळ सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागाच्या परिविक्षा अधिकाऱ्यांसाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई, महाराष्ट्र येथे दोन दिवसीय प्रमाणन कार्यक्रम | मुंबई |

लोकांमध्ये मानवी हक्कांबाबत जागरुकता निर्माण करणे ही आयोगाची प्रमुख जबाबदारी आहे. वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की आयोगाने विविध कार्यक्रम आणि उपक्रमांची रचना आणि अंमलबजावणी अशी केली आहे की ज्यामुळे लोकांना त्यांचे अधिकार आणि त्यांचा वापर कसा करावा याबद्दल ज्ञान प्राप्त होते. या कार्यक्रमांमध्ये शैक्षणिक कार्यशाळा, परिसंवाद आणि लोकांच्या विविध गटांसाठी प्रशिक्षण सत्रे यांचा समावेश होतो जसे की विद्यार्थी, कार्यरत व्यावसायिक आणि समुदाय नेते.

राष्ट्रीय स्तरावर जागरुकता वाढवण्यासोबतच, आयोग आंतरराष्ट्रीय मानवी हक्क शिक्षणाला चालना देण्यासाठी देखील जबाबदार आहे. तसेच आयोग सर्वोत्तम पद्धतींचे आदान-प्रदान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषद आणि कार्यक्रम आयोजित करणे आणि त्यात सहभागी होणे यासाठी देखील जबाबदार आहे.

आयोगाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नागरी समाज संस्था, प्रसारमाध्यमे आणि सरकारी संस्थांचा समावेश असलेल्या सर्व स्वारस्यधारकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी मानवी हक्क जागरुकतेला प्रोत्साहन देणे. आयोग स्वारस्यधारकांना समर्थन आणि मार्गदर्शन करतो आणि मानवी हक्क जागरुकता वाढवण्यामध्ये त्यांची उपलब्धी ओळखतो.

## विभाग 6

## शासनाला केलेल्या शिफारसी

मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 च्या कलम 18 अंतर्गत आयोगाला शिफारसी करण्याचा अधिकार आहे. या कलमानुसार आयोगाला मानवी हक्क भंगाच्या बाबतच्या तक्रारींबाबत चौकशी करण्याचा व शासनासह संबंधित अधिकाऱ्यांना शिफारसी करण्याचा अधिकार आहे. ज्या बाबतीत आयोगाला असे वाटते की, मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे तिथे ते शासनासह संबंधित अधिकाऱ्यांना योग्य कृती करण्याची शिफारस करु शकतो. अशा शिफारसींमध्ये मानवी हक्कांचे उल्लंघन पुढे होऊ नये यासठी उपाय योजणे, पीडीत व्यक्तींना मोबदला देणे व हिंसाचार / अत्याचार करणाऱ्याविरुद्ध कृती करणे यांचा समावेश असतो.

त्याखेरीज आयोग मानवी हक्कांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाय योजना सूचवू शकतो व मानवी हक्कांच्या बाबतीत राज्य सरकारला मार्गदर्शक तत्वे सूचवू शकतो. आयोगाने केलेल्या शिफारसी बंधनकारक नाहीत, परंतु त्याला बरेच महत्व आहे व सर्वसाधारणपणे संबंधित अधिकारी त्यांची अंमलबजावणी करतात.

| अ.क्र. | खटला क्रमांक / स्वरुप | आदेश दिनांक | शिफारसी |
|---|---|---|---|
| 1. | एमएएस / केस नं.1620/2018<br><br>पोलीस पथक, ईडी युनिट, ठाणे यांच्याकडून शारीरिक आणि मानसिक छळ. | 18.01.2022 | सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. महाजन यांनी तक्रारदारास रु.1,00,000/- नुकसान भरपाई द्यावी. या आदेशाची अंमलबजावणी 6 आठवड्यात न झाल्यास त्याची पूर्तता होईपर्यंत 12% व्याजही दिले पाहिजे. |
| 2. | एमएएस / केस नं.878/12/23/2019<br><br>बेकायदेशीरपणे अटक, छळ आणि खंडणी | 09.05.2022 | पोलीस अधिकारी किरण रोहिदास लांडगे, राजू त्र्यंबक केदारी, रमेश गबाजी नाळे यांनी पीडित व्यक्ती श्री. इश्तियाक उर्फ मुश्ताक एम. खान यांना प्रत्येकी रु.2,00,000/- (एकूण रु. 6,00,000/-) नुकसान भरपाई द्यावी. |
| 3. | डिव्हिजन बेंच<br>केकेटी/ सुओ मोटो केस नं.-1080/13/5/2022 | 13.06.2022 | अप्पर मुख्य सचिव (महसूल आणि वने) आवश्यक अंमलबजावणी आणि पुढील कार्यवाहीसाठी पुढीलप्रमाणे आदेश आहे -<br><br>क्रं.एससीवाय- 1205/प्र.क्रं.189/म-7 दिनांक 23.01.2006 मध्ये निश्चित केलेल्या नुकसान भरपाईसाठी धोरणे आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सुधारणा करून प्रत्येक कुटुंबाला रु.1,00,000/- ऐवजी रु.10,00,000/- नुकसान भरपाई द्यावी. |
| 4. | केकेटी / केस नं. 4360/13/12/2021<br><br>पोलीस प्राधिकरण राजकीय व्यक्तींच्या प्रभावाखाली गुन्हेगाराविरुद्ध प्रथम माहिती अहवाल नोंदवत नाही. | 22.06.2022 | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय यांनी हा आदेश मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत मानसिक छळासाठी रु.50,000 भरपाई द्यावी. |
| 5. | एमएएस / केस नं.838/2017<br>पोलिसांची गैरवर्तणूक | 06.07.2022 | पोलिस महासंचालक, मुंबई यांनी गुन्हेगार श्री. दिलीप कांबळे यांच्याविरुद्ध गुन्हा क्र. 62/16 साठी भा.द.वि. 304 अ, 279 ते भारतीय दंड विधानाचे कलम 302, 201 हटवून भारतीय दंड विधान 302 अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्याचे आदेश दिले.<br>पोलीस अधिकारी सहा. पोलीस आयुक्त श्री. आबासाहेब आनंदराव पाटील, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई आणि सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री. नंदकिशोर दिगंबर सस्ते यांनी तक्रारदार श्रीमती सरिता महादेव शेडगे यांना रु.2,00,000/- नुकसान भरपाई द्यावी. |
| 6. | एमएएस / केस नं.5368/2018<br><br>निवारा हक्काचे सर्रास उल्लंघन केले | 01.09.2022 | प्रतिवादी प्राधिकरण सीईओ, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी तक्रारदार बसंती वाघेला यांना रु.1,50,000/- नुकसान भरपाई द्यावी. |
| 7. | केकेटी / केस नं. 1388/2015<br><br>पोलिसांकडून बेकायदेशीरपणे ताब्यात घेणे, मानसिक छळ आणि अत्याचार | 12.09.2022 | पोलिस आयुक्त, ठाणे यांना शिफारस केली आहे की त्यांनी तक्रारदाराला मानसिक छळासाठी लवकरात लवकर परंतु कोणत्याही परिस्थितीत 23.12.2022 पूर्वी रु.1,00,000/- ची नुकसान भरपाई द्यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | केकेटी / केस नं. 1492/13/8/2022<br>पोलिसांनी प्रथम माहिती अहवाल नोंदवण्यास नकार दिला | 27.09.2022 | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग आणि / किंवा पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांना आदेश मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या आत तक्रारदारास रु. 2,00,000/- ची भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत. असे न केल्यास आयोगाने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून तक्रारदार प्रतिवर्ष 9% व्याज मिळण्यास पात्र आहेत. |
| 9. | एमएएस / केस नं.7015/2018<br>संबंधित साखर कारखान्याने कचरा टाकल्याने नदीचे प्रचंड प्रदूषण | 30.09.2022 | रु.10,00,000/- ची नुकसान भरपाईची रक्कम व्यवस्थापनाकडून वसूल करुन खेड्यातील पायाभूत सुविधांमध्ये योग्य वापरासाठी आणि सुधारणेसाठी कोल्हापूरच्या पंचायत समितीकडे जमा करावी. |
| 10. | केकेटी / केस नं. 1155/13/16/2022/255<br>पोलिस प्रशासन अपयशी ठरल्याने कारवाईकडे दुर्लक्ष झाले | 10.01.2023 | अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई आणि उप. पोलीस आयुक्त, विभाग-6, मुंबई यांनी तक्रारदारास रु.2,00,000/- ची नुकसान भरपाई द्यावी. तक्रारदार तक्रारीच्या तारखेपासून रक्कम वसूल होईपर्यंत प्रतिवर्ष 8% व्याज मिळण्यास पात्र आहेत |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाने विविध बाबींमध्ये नुकसान भरपाई देण्याचा आपला अधिकार बजावला आहे. सदर तक्त्यामध्ये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने विविध बाबींमध्ये मानवी हक्कांचा भंग झाल्यामुळे नुकसान भरपाई देण्याची शिफारस केलेल्या बाबींचा सारांश दिला आहे. सदर नुकसान भरपाईची रक्कम रु.25,000/- ते रु.10,00,000/- या मर्यादेमध्ये आहे. मानवी हक्क भंगाच्या किरकोळ बाबींमध्ये कमीत कमी नुकसान भरपाईची शिफारस केली आहे, तर गंभीर बाबींमध्ये की ज्यात जीव गमवावा लागला आहे किंवा अत्यंत गंभीर दुखापत झाली आहे त्यामध्ये जास्त नुकसान भरपाईची शिफारस केली आहे.

या शिफारशींमध्ये मानवी हक्क भंगाचे पुढील उल्लंघन टाळण्यासाठी उपाययोजना, पीडितांना नुकसानभरपाई आणि दोषींवर कारवाईचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने शिफारस केलेली नुकसान भरपाई सदर मानवी हक्क भंग किती गंभीर आहे, त्यामुळे नुकसान किती झाले आहे हिंसाचार करणाऱ्याची आर्थिक स्थिती यावर अवलंबून आहे. उपरोक्त तक्त्यामध्ये मानवी हक्काचे उल्लंघन व हक्क भंगामुळे पीडीत झालेल्या व्यक्तींना पुरेशी नुकसान भरपाई मिळावी यामध्ये आयोगाची भूमिका अधोरेखित करते. मानवी हक्क भंगाच्या बाबी हलक्या समजू नयेत व

हिंसाचार करणाऱ्यांना त्यांच्या कृतीबद्दल जबाबदार धरावे यासाठी हे एक स्मरणपत्र म्हणूनही काम करते.


## विभाग 7

## स्त्रोत


**2022-2023 या वर्षासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी (रुपये हजारात)**

| अनुदान | रुपये हजारात |
|---|---|
| वेतनासाठी अनुदान (हजारामध्ये) | 46708.5 |
| वेतनेतर अनुदान (हजारामध्ये) | 38732.3 |
| **एकूण** | **85440.8** |

**वित्तीय वर्ष 2022-23 करिता शासनाकडून प्राप्त निधी (रुपये हजारात)**



**वित्तीय वर्ष 2022-23 करिता शासनाकडून प्राप्त निधी (रुपये हजारात)**



## **वित्तीय वर्ष 2022-23 चा सारांश**

मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 नुसार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना 2001 साली झाली. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 नुसार आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (पद्धती) नियम 2011 नुसार कार्य करतो.

पुढील तक्त्यामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निपटारा केलेल्या बाबींचा तपशील दिला आहे.

01.01.2022 ते 31.12.2022 मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निपटारा केलेल्या बाबींचा तपशील दिला आहे.

| **पूर्वीचे प्रलंबित / आरंभीची शिल्लक** | **नवीन प्राप्त / तक्रारी** | **या कालावधीत एकत्रित तक्रारी** | **वर्षभरात एकूण निपटारा** | **मदत / शिफारशीची एकूण प्रकरणे** | **या कालावधीच्या शेवटी प्रलंबित प्रकरणे** |
|---|---|---|---|---|---|
| 24628 | 6998 | 31626 | 9203 | 62 | 22423 |

2022-2023 या आर्थिक वर्षासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी

| **अनुदान** | **रुपये (हजारामध्ये)** |
|---|---|
| **वेतन** | 46708.5 |
| **वेतनेतर** | 38732.3 |
| **एकूण प्राप्त अनुदान** | **85440.8** |

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची 2022-2023 या वर्षातील तपशीलवार कामगिरी वार्षिक अहवालात समाविष्ट केली आहे.

18-1-2024

न्यायमूर्ती के.के.तातेड (सेवानिवृत्त)

(अध्यक्ष)

M. A. Sayeed

(एम.ए. सईद)

सदस्य

(भगवान डी. मोरे)

सदस्य

दि.08.04.2023 रोजी (म. नं.) सेवानिवृत्त झाले

शासकीय, मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई